# लोहमार्ग पोलिसांकडून आरोग्ययंत्रणेला मदत

आशेची लस

**पुणे :** आरोग्य यंत्रणेवरील वाढत्या ताणामुळे संसाधनांची कमतरता भासत असताना, पुणे लोहमार्ग पोलिस अधीक्षक कार्यालयाने मदतीचा हात पुढे केला आहे. लोहमार्ग पोलिसांसाठी खरेदी केलेल्या उच्च रक्तदाब मोजण्याच्या मशिनपासून ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटरपर्यंतच्या अनेक वस्तू जिल्हा आरोग्य प्रशासनाला देण्यात येणार आहेत.

करोनादरम्यान पुणे लोहमार्ग पोलिस अधीक्षक कार्यालयाने अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी विविध वैद्यकीय उपकरणे खरेदी केली होती. त्यात प्राथमिक आरोग्य सुविधा आणि प्रतिबंधात्मक साधनांचा समावेश आहे. सद्यपरिस्थिती लक्षात घेऊन पुणे लोहमार्ग पोलिस अधीक्षक सदानंद वायसे पाटील यांच्या सूचनेनुसार हे सर्व साहित्य जिल्हाधिकारी कार्यालयांना सुपूर्द करण्यात येणार आहे.

> **“ करोनाकाळात कर्तव्यावर असलेल्या लोहमार्ग पोलिसांसाठी विविध प्रकारच्या वैद्यकीय साहित्याची खरेदी केली होती. मात्र, समाजातील परिस्थिती पाहता, ते साहित्य समाजासाठी अधिक उपयुक्त ठरू शकते. त्यामुळे हा निर्णय घेतला.**
>
> **– सदानंद वायसे पाटील,**
> अधीक्षक, पुणे लोहमार्ग पोलिस

फेब्रुवारी २०२१मध्ये आठ ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर, आठ ओझोन जनरेटर, आठ रक्तदाब तपासणी मशिन, २० ग्लुकोमीटर, आठ डिजिटल वजनकाटे, १९ वॉटर डिस्पेन्सर आदी साहित्याची खरेदी केली होती. हे साहित्य पुणे, दौंड, सोलापूर, कुर्डूवाडी, नगर, मिरज, लोहमार्ग उपअधीक्षक कार्यालय, मुख्यालय आदी कार्यालयांना वाटप करण्यात आले आहे. वायसे पाटील यांनी ही उपकरणे संबंधित लोहमार्ग पोलिस ठाण्यांच्या जिल्हा आरोग्य प्रशासनाला देण्याची सूचना केली आहे.

Scanned by TapScanner